अतितात्काळ

क्र.पोमंस२८/८७८०/जि.व.परी.स्पर्धा/२३७/२०१७ मुंबई, दि ३१ /०७/२०१७

विषय :— जिल्हा / परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा — २०१७

परिपत्रक :—

या वर्षी जिल्हा / परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

१) घटक / जिल्हा क्रीडा स्पर्धा ३१ ऑगस्ट अगोदर पुर्ण करणे.

२) परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धा ५ ऑक्टोंबर अगोदर पुर्ण करणे.

२. प्रत्येक परिक्षेत्र व आयुक्तालयामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या पोलीस घटक प्रमुखांची नावे परिशिष्ट '' अ'' मध्ये नमूद करण्यात आली आहेत. परिशिष्ट ''अ' मध्ये नमूद करण्यात आलेले १३ संघ आगामी राज्य पोलीस क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होतील. सर्व घटकांनी त्यांच्या स्पर्धा Knock Out तत्वावर घ्याव्यात, आणि संबंधीत परिक्षेत्रीय स्पर्धामध्ये भाग घेण्यासाठी त्यांचे संघ तयार करावेत. राज्य पोलीस क्रीडा स्पर्धामध्ये समाविष्ट असलेल्या सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारांची यादी ''परिशिष्ट ब'' मध्ये नमूद करण्यात आली आहे. सदर यादीमध्ये नमूद केलेल्या क्रीडा प्रकारांचा समावेश जिल्हा व परिक्षेत्रीय स्पर्धा मध्ये करण्यात यावा.

३. परिक्षेत्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा League पध्दतीने घेण्यात याव्यात. पोलीस आयुक्त/ अपर पोलीस महासंचालक/ विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी प्रत्येक क्रीडा प्रकारातील सुयोग्य खेळाडूंची घटक संघातून संबंधीत परिक्षेत्रीय संघामध्ये निवड करावी. परिक्षेत्रीय संघ तयार करताना ज्युडो, जलतरण, कुस्ती, वेटलिफ्टिंग आणि ॲथलेटिक्स् यामध्ये प्रत्येक वैयक्तीक क्रीडा प्रकाराकरीता/वजनी गटाकरीता फक्त दोन स्पर्धक निवडावेत, आणि बॉक्सींग करीता प्रत्येक वजनी गटाकरीता फक्त एक स्पर्धक निवडावा. घटकातील प्रत्येक खेळाडूंची वैयक्तीक कामगीरी लक्षात घेवून, त्या मधून फक्त गुणवत्ता धारक खेळाडूंची परिक्षेत्रीय संघामध्ये निवड करण्यासाठी परिक्षेत्रीय स्तरावरील सांघिक खेळांच्या स्पर्धा League पध्दतीने घेण्याचा मुख्य उद्देश आहे.

४. जिल्हा/परिक्षेत्रीय स्पर्धेतील पुरूष व महिलांच्या वेगवेगळया जनरल चॅम्पीयनशिपकरीता, व ॲथलेटिक्स् वैयक्तीक चॅम्पीयनशिपकरीता संदर्भ पत्र क्रमांक.पोमंस/२८/४९३७/एम.एस.पी.जी. २०१७/३५०/२०१६ दि.२४/११/२०१६ अन्वये २९व्या महाराष्ट्र क्रीडा स्पर्धा २०१७ औरंगाबाद करीता वितरीत केलेल्या जॉइनिंग इन्स्ट्रक्शन्स मधील पॅरा क्रमांक १७ प्रमाणे कार्यवाही करावी. एखाद्या खेळाडूने जास्त पदके मिळवली हा मुद्दा गौण समजण्यात यावा. गतवर्षी काही घटकांकडून बेस्ट ॲथलिट निवडताना त्यांचा विचार केलेला नाही.

५. ॲथलेटिक्स् या क्रीडा प्रकारामध्ये एक खेळाडू दोन वैयक्तीक व दोन रिले प्रकारामध्ये भाग घेवू शकेल. या पेक्षा जास्त क्रीडा प्रकारामध्ये एक खेळाडू भाग घेवू शकणार नाही. खेळाडूंच्या वयासंदर्भात संदर्भ पत्र क्रमांक.पोमंस/२८/४९३७/एम.एस.पी.जी.२०१७/३५०/२०१६ दि.२४/११/२०१६ अन्वये २९व्या महाराष्ट्र क्रीडा स्पर्धा २०१७ औरंगाबाद करीता वितरीत केलेल्या जॉइनिंग इन्स्ट्रक्शन्स मधील पॅरा क्रमांक ४ प्रमाणे कार्यवाही करावी.

६. तरी खाली नमूद सर्व घटक पोलीस प्रमुखांना विनंती करण्यात येते की, जिल्हा आणि परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धा वर नमूद केलेल्या कालावधीत पार पाडाव्यात, आणि त्याबाबतचा अहवाल स्पर्धेच्या अंतिम निकालासह या कार्यालयास पाठवावा. जेणेकरून या कार्यालयास राज्यस्तरावरील स्पर्धा आयोजीत करण्याच्या दृष्टीने पुढील आवश्यक कार्यवाही करणे शक्य होईल, तसेच घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकामधील प्रत्येक क्रीडा प्रकारातील चांगल्या, निपूण व गुणी खेळाडूंची निवड करून त्यांना चांगल्या प्रकारे प्रशिक्षण, आणि सराव देण्याबाबतही तातडीने सुरूवात करावी.

२/—

७. सदर क्रीडा स्पर्धा आयोजित करताना फायर वर्क्स, रोषणाई, ऑर्केस्ट्रा, तसेच इतर कार्यक्रम इत्यांदींवर घटक पोलीस कल्याण निधीतून होणारा अनावश्यक खर्च टाळावा. उद्घाटन समारंभ घेण्यात येवू नये.

८. यावर्षी राष्ट्रिय पोलीस स्पर्धांचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

१) अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०१७ – व्हॉलीबॉल क्लस्टर दि. १० ते १४ ऑक्टोंबर २०१७
२) अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०१७ – रेसलिंग क्लस्टर दि. २७ ते ३१ ऑक्टोबंर २०१७
३) अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०१७ – आर्चरी. दि. ०७ ते ११ नोव्हेंबर २०१७
४) अखिल भारतीय पोलीस ॲथलेटिक्स् स्पर्धा २०१७ दि. २१ ते २५ नोव्हेंबर २०१७

९. सदर प्रकरणी आवश्यकता भासल्यास सहायक पोलीस क्रीडा अधिकारी, महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा संकुल, घाटकोपर यांचेशी परस्पर संपर्क साधावा.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे.
संचालक, पोलीस बिनतारी संदेश,म.राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके/रा.रा.पो.बल/वाहतूक/ दहशतवाद विरोधी पथक/ लोहमार्ग, म.राज्य,मुंबई.
इतर सर्व पोलीस आयुक्त,(लोहमार्ग सह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग,म.राज्य.मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक,रा.रा.पो.बल,पुणे व नागपूर/मो.प.पुणे/ना.ह.सं., म.राज्य,मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र,कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व समादेशक,रा.रा.पो.बल.गट १ ते १६
सर्व प्राचार्य, पो.प्र.विद्यालये,
उप संचालक, डी.टी.सी.नाशिक

प्रत सस्नेह अग्रेषित :

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्यरो,म.राज्य,मुंबई.
महासमादेशक, होमगार्ड आणि संचालक,नागरी सुरक्षा महाराष्ट्र राज्य मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ मर्या. मुंबई

परिशिष्ट ''अ''

जिल्हा/परिक्षेत्र/राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०१७

| | | |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई आयुक्तालय | आयुक्तालयामधील सर्व परिमंडळे/प्रादेशिक विभाग/शाखा |
| २ | पुणे आयुक्तालय | आयुक्तालयामधील सर्व परिमंडळे/प्रादेशिक विभाग/शाखा |
| ३ | औरंगाबाद /नांदेश परिक्षेत्र | १) औरंगाबाद आयुक्तालय २) औरंगाबाद ग्रा ३) जालना ४) बीड ५) उस्मानाबाद ६) नांदेड ७) लातूर ८) परभणी ९) हिंगोली |
| ४ | नागपूर आयुक्तालय | आयुक्तालयामधील सर्व परिमंडळे/प्रादेशिक विभाग/शाखा |
| ५ | अमरावती आयुक्तालय/ परिक्षेत्र | १) अमरावती आयुक्तालय २) अमरावती ग्रा ३) अकोला ४) बुलढाणा ५) वाशिम ७) यवतमाळ |
| ६ | ठाणे आयुक्तालय | आयुक्तालयामधील सर्व परिमंडळे/प्रादेशिक विभाग/शाखा |
| ७ | प्रशिक्षण संचालनालय | महाराष्ट्र पोलीस अकादमी आणि सर्व पोलीस प्रशिक्षण विद्यालये |
| ८ | नाशिक आयुक्तालय/ परिक्षेत्र | १) नाशिक आयुक्तालय २) नाशिक ग्रामिण ३) धुळे ४) जळगाव ५) अहमदनगर ६) नंदुरबार |
| ९ | नवी मुंबई /कोंकण परिक्षेत्र | १) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय २) ठाणे ग्रा. ३) सिंधुदूर्ग ४) रायगड ५) रत्नागिरी ६) पालघर |
| १० | सोलापूर आयक्तालय/ कोल्हापूर परिक्षेत्र | १) सोलापूर आयुक्तालय २) सोलापूर ग्रा ३) कोल्हापूर ४) सातारा ५) सांगली ६) पुणे ग्रा |
| ११ | नागपूर परिक्षेत्र | १) नागपूर ग्रा २) भंडारा ३) चंद्रपूर ४) वर्धा ५) गडचिरोली ६) गोंदिया ७) आहेरी |
| १२ | लोहमार्ग परिक्षेत्र | १) लोहमार्ग मुंबई २) लोहमार्ग पुणे ३) लोहमार्ग नागपूर |
| १३ | राज्य राखीव पोलीस दल | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६ |